लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा,
भास्कर इमारत, अनंत कानेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-२६४७२७८७/२६४७०१४६
Website-https://sccmumbai.dcourts.gov.in
ई–मेल : scc-bandra@bhc.gov.in

जाहीर निविदा

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, मुंबई–४०० ०५१ येथील कार्यालयासाठी दोन **'उपस्थिती प्रणाली यंत्रणा' (Biometric Attendence Machine)** हे खरेदी करणे आवश्यक असून त्यासाठी विविध शासकीय/खाजगी संस्थांकडून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक खाजगी व शासकीय संस्था/कंपन्यांनी आपले दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात, त्या लिफाफ्याच्या वरच्या बाजुस मोठ्या अक्षरात **'उपस्थिती प्रणाली यंत्रणा' (Biometric Attendence Machine) खरेदीसाठीचे दारपत्रक'** असे लिहून ते 'अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पुर्व) मुंबई – ४०० ०५१' ह्या पत्त्यावर **गुरुवार, दिनांक ०८ जानेवारी, २०२६ रोजी, दुपारी ५:००** वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

तसेच दरपत्रके स्वीकारण्याचा वा रद्द करण्याचा तसेच खरेदी प्रक्रियेसंबंधातील सर्व अधिकार मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय मुंबई यांच्या अधिन राहतील.

(आर. के. कुळकर्णी)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा

लघुवाद न्यायालय, वांद्रे, मुंबई }

मुंबई : ३० डिसेंबर, २०२५

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा,
भास्कर इमारत, अनंत कानेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-२६४७२७८७/२६४७०१४६
Website-https://sccmumbai.dcourts.gov.in
ई—मेल : scc-bandra@bhc.gov.in

‘उपस्थिती प्रणाली यंत्रणा’ (Biometric Attendence Machine) खरेदी प्रक्रियेसंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१.	दरपत्रक सादर करणाऱ्या संस्था/कंपनीचा पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता, ई—मेल आयडी, दुरध्वनी आणि भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रक पाकिटावर नमूद करावे.
२.	दरपत्रक सादर करणाऱ्या संस्था/कंपनीचा सेवाकर प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत, पॅन कार्ड, जी.एस.टी. क्रमांक, अदाता नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती मोहरबंद दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे.
३.	‘उपस्थिती प्रणाली यंत्रणा’ (Biometric Attendence Machine) बाबत Guarantee/Warranty Period आणि Specification आपल्या दरपत्रकात नमूद करणे आवश्यक आहे. तसेच ‘उपस्थिती प्रणाली यंत्रणा’ (Biometric Attendence Machine) खरेदी झाल्यानंतर काही मशीनमध्ये काही बिघाड झाल्यास आपल्या संस्थेकडून कोणताही चार्ज न लावता त्वरीत तंत्रज्ञ व्यक्ती पाठविण्यात यावा.
४.	वस्तूची किंमत आणि सर्व करांची रक्कम (GST % & Amount) दरपत्रकात सविस्तरपणे नमूद करणे आवश्यक आहे.
५.	संस्था/कंपनीचे दरपत्रक न्युनत्तम असतानाही वस्तूची गुणवत्ता आणि इतर बाबी ह्या खरेदीसाठी उपयुक्त नसल्याचे आढळून आल्यास त्याऐवजी त्यांच्या पुढील क्रमवारीनुसार दरपत्रकधारक संस्थेची निवड करण्यात येईल. याचे सर्व अधिकार खरेदी समितीकडे राखून आहेत. याची नोंद घ्यावी.
६.	निवड झालेल्या दरपत्रकधारक संस्थेकडून पुरवठा करीत असलेल्या ‘उपस्थिती प्रणाली यंत्रणा’ (Biometric Thumb Machine) मध्ये काही त्रुटी वा दोष अर्थात तुटलेले अथवा वस्तूचा दर्जा व गुणवत्ता खराब असल्यास त्याऐवजी दुसरा नविन ‘उपस्थिती प्रणाली यंत्रणा’ (Biometric Attendence Machine) देणे आपणांस बंधनकारक राहील.
७.	जाहीर निविदेचे मोहरबंद दरपत्रक हे संबंधित खरेदी समितीसमोर निश्चित केलेल्या दिवशी उघडण्यात येतील. त्यावेळेस दरपत्रकधारक संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी यांनी हजर राहणे आवश्यक आहे. सदर दिवशी समितीच्या बैठकीत ‘उपस्थिती प्रणाली यंत्रणा’ (Biometric Attendence Machine) नमुना (Sample of Machine) समितीच्या पडताळणीसाठी बैठकीच्या वेळी या कार्यालयात घेऊन येणे बंधनकार राहील.

८.	दरपत्रकधारकाचे/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकाधाराकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल.
९.	निवड झालेल्या संस्थेने 'उपस्थिती प्रणाली यंत्रणा' (Biometric Attendence Machine) कार्यालयात नि:शुल्क पोहोच करावयाचे आहे. तसेच त्यासाठी होणारा Installation चा खर्च हा कार्यालयाकडून अदा करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
१०.	निवड झालेल्या संस्थेने 'उपस्थिती प्रणाली यंत्रणा' (Biometric Attendence Machine) हे कार्यालयाचे खरेदी आदेश पत्र (Purchase Order Letter) मिळाल्यापासून ५ दिवसांच्या आत पुरवठा करावा. ५ दिवसात पुरवठा न झाल्यास सदर संस्थेची निवड रद्द करण्यात येईल.
११.	दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने जाहीर निविदेसोबत असलेल्या सर्व अटी व शर्ती मंजूर असल्याचे व त्या अटींचे पालन करण्यात येईल असे लेखी हमी पत्र देणे बंधनकारक राहील.
१२.	मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांना सदर जाहीर निविदा प्रक्रिया रद्द करणे किंवा त्यामध्ये बदल करणे याचे पूर्ण अधिकार आहेत. तसेच दरपत्रकात अथवा सोबतच्या कागदपत्रात अथवा आपल्याकडून पूरवठा होत असलेल्या वस्तूमध्ये काही त्रुटी आढळल्यास सदरचे दरपत्रक रद्द करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. त्याबाबत कोणतीही तक्रार वा आक्षेप स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

30/12/2025

लघुवाद न्यायालय, वांद्रे, मुंबई }
}
मुंबई : ३० डिसेंबर, २०२५ }

(आर. के. कुळकर्णी)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा